दैनिक
अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
# रायगड नगरी
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक १६५ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.१५ सप्टेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

### मुंबई ट्रान्स हार्बर लिंकच्या कामाची मुख्यमंत्र्यांकडून पाहणी

# रायगड जिल्ह्यातील चिर्ले परिसरात निर्माण होणार नविन ग्रोथ सेंटर : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**मुंबई ट्रान्स हार्बर लिंक प्रकल्पाचे काम ८४ टक्के पूर्ण झाले आहे. पुढील वर्षी डिसेंबरपूर्वी हा प्रकल्प पूर्ण होईल. त्यामाध्यमातून रायगड जिल्ह्यातील चिर्ले जवळील पेण, पोयनाड परिसरात ग्रोथ सेंटर निर्माण करण्यात येणार आहे. लॉजिस्टिक्स पार्क, टाऊनशिप आणि रोजगार निर्मिती या तीन बाबींवर लक्ष केंद्रित केले जाणार असून त्यामाध्यमातून याभागाचा सूनियोजितपणे विकास होईल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.**



शिवडी येथून सुरू झालेल्या मुंबई ट्रान्स हार्बर लिंक प्रकल्पाच्या कामाची पाहणी मुख्यमंत्र्यांनी केली. यावेळी त्यांनी प्रत्यक्ष सागरी सेतूवर जावून कामाचा आढावा घेतला. यावेळी एम एम आर डी एचे महानगर आयुक्त एस.व्ही.आर. श्रीनिवास यांनी कामाबाबत माहिती दिली. या प्रकल्पाचे काम करताना ऑर्थोटॉपीक स्टील डेस्क (ओएसडी) या जपानी तंत्रज्ञानाचा प्रथमच वापर पहिल्यांदाच करण्यात आला आहे. त्याचे वजन कॉँक्रीटपेक्षा कमी असून वेगाने काम होण्यास मदत होत आहे. पर्यावरणपूरक असा हा प्रकल्प असून त्याच्या माध्यमातून वर्षाला सुमारे २६ हजार टन कार्बनडायऑक्साईड कमी होणार आहे तीन पॅकेजच्या माध्यमातून या प्रकल्पाचे काम सुरू असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. यावेळी शिवडी प्रकल्प कार्यालयास मुख्यमंत्र्यांनी भेट दिली. श्रीनिवास यांनी प्रकल्पाबाबत सादरीकरण केले.

राज्याच्या सकल उत्पन्नात सर्वाधिक वाटा मुंबई महानगर क्षेत्रातून येत असून या भागातील नागरिकांना हा प्रकल्प फायदेशीर ठरणार आहे, असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, मुंबई ट्रान्स हार्बर लिंक चिर्ले गावाजवळून मुंबई पुणे द्रुतगती महामार्गाला जोडण्यात येणार आहे. त्याचबरोबर हा प्रकल्प ईस्टर्न फ्री वे ला जोडणार असल्याने थेट रायगडच्या दिशेने प्रवास करणे शक्य होणार आहे. शिवाय मुंबई - वरळी कोस्टल रोड देखील शिवडी वरळी कनेक्टरमार्गे हा प्रकल्प जोडण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

### दिवसाला एक लाख वाहनांची ये-जा करण्याची क्षमता

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, मुंबईला रायगड जिल्ह्याशी थेट जोडणारा हा २२ किमी लांबीचा देशातील सर्वाधिक मोठा पहिला सागरी सेतूमार्ग आहे. या सागरी सेतूवरून दिवसाला किमान एक लाख वाहनांची ये-जा करण्याची क्षमता असून नागरिकांच्या वेळेची तसेच इंधनाची मोठी बचत होईल. प्रदूषण विरहित असा हा प्रकल्प असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. त्याचे काम करताना पर्यावरणासोबतच फ्लेमिंगोंची देखील काळजी घेण्यात आली असून गेल्या वर्षीपेक्षा यंदा जास्त फ्लेमिंगो आल्याचे त्यांनी सांगितले. या सागरी सेतूमुळे मुंबई ते रायगड जिल्ह्यातील चिर्ले हे अंतर केवळ १५ ते २० मिनिटात पार करणे शक्य होईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

# तरूणांनी मोठ्या संख्येने 'इंडियन स्वच्छता लीग' रॅलीमध्ये सहभागी व्हावे : आयुक्त गणेश देशमुख

### १७ सप्टेंबरला खारघर, कळंबोली, पनवेलमध्ये भव्य रॅलीचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

केंद्र शासनामार्फत 'स्वच्छ अमृत महोत्सव–ाचे आयोजन दिनांक १७सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत 'इंडियन स्वच्छता लीग'स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. शहराच्या स्वछतेमध्ये तरूणांचा सहभाग वाढवा , शहराशी आपुलकीचे नाते निर्माण व्हावे दृष्टीने या उपक्रमांनिमित्ताने दिनांक १७ सप्टेंबरला खारघरमध्ये सायकल रॅली, कळंबोली, पनवेलमध्ये पदयात्रा आणि स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. 'इंडियन स्वच्छता लीगच्या' रॅलीमध्ये तरूणांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन आयुक्त श्री.गणेश देशमुख यांनी केले आहे.

केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे 'स्वच्छ भारत' अभियानाची पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये प्रभावी अमंलबजावणी सुरु आहे. केंद्र शासनाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या 'इंडियन स्वच्छता लीग' उपक्रमांतर्गत पनवेल महानगरपालिकेने आपली 'पनवेल चॅम्पियन्स' ही टिम तयार केली असून पनवेलमधील प्रसिध्द आंतरराष्ट्रीय टेबल टेनिसपटू स्वस्तिका घोष ही या टिमची कॅप्टन असणार आहे.

स्वच्छ व सुंदर शहराचे निर्माण व्हावे या उद्देशाने या उपक्रमांतर्गत जनजागृती करण्याच्या दृष्टीने भव्य सायकल रॅली आणि पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक १७ सप्टेंबरला सकाळी साडेसात वाजता खारघरमध्ये, कळंबोली,पनवेलमध्ये अशा तीन ठिकाणी रॅली काढण्यात येणार आहे. या रॅलीमध्ये तरूणांनी सहभागी होण्यासाठी



https://innovateindia.mygov.in/swachhyouthrally/ या लिंकवरती जाऊन रजिस्ट्रेशन करावे असे आवाहन आयुक्त श्री. गणेश देशमुख यांनी केले आहे.

या भव्य रॅलीच्या नियोजनासाठी उपायुक्तांची नोडल अधिकारी म्हणून निवड करण्यात आली असून प्रभाग अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. या सायकल रॅली,पदयात्रेच्या माध्यमातून स्वच्छतेचे महत्व नागरिकांना पटवून देण्यात येणार आहे. या रॅलीसाठी ५० हजार युवकांचे लक्ष्य् महापालिकेने ठेवले आहे. महापालिका क्षेत्रातील शाळा–महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांनी या रॅलीमध्ये मोठ्या प्रमाणात सहभाग घ्यावा असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

महापालिका मुख्यालय, प्रभाग कार्यालये, महाविद्यालयांच्या बाहेर या उपक्रमांचे फलक लावण्यात येणार आहेत. या फलकांवरती क्यू आर कोड आणि लिंक दोन्ही असणार आहेत. फलकावरील क्यू आर कोडला स्कॅन असता, उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठीची रजिस्ट्रेशन लिंक ओपन हाणार आहे.

# खोपटा-कळंबुसरे-चिरनेर बायपास रस्ता हरवला खड्ड्यात



**दै.रायगड नगरी । उरण**

खोपटा – कळंबुसरे – चिरनेर बायपास रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडले आहेत.त्यामुळे वाहन चालकांना खड्ड्यातून मार्गक्रमण करताना मोठी कसरत करावी लागत आहे.तरी सार्वजनिक बांधकाम विभाग उरण येथील उप अभियंता नरेश पवार यांनी खड्डे युक्त रस्ते खड्डे मुक्त करण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी मागणी मनसेचे रायगड जिल्हा अध्यक्ष संदेश भाई ठाकूर यांनी केली आहे.

मनसेचे जिल्हाध्यक्ष संदेश भाई ठाकूर यांनी रस्त्याच्या दुरावस्थे संदर्भात माहिती देताना सांगितले की खोपटा पुल – कोप्रोली– चिरनेर या रस्त्याच्या नव्याने रुंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामासाठी व दुरुस्तीसाठी सरकार आणि या परिसरातील कंटेनर यार्ड कडून सार्वजनिक बांधकाम विभागाने सन २०१९ ते २२ पर्यंत जवळजवळ ६ कोटींचा निधी खर्च केला असेल. परंतु ठेकेदारांच्या तकलादू कामामुळे खर्च करण्यात आलेला निधी वाया गेला आहे. हे खोपटा पुल रस्त्यावर पडणाऱ्या सततच्या खड्ड्यांमुळे पाहावयास मिळत …/२

# अट्टल गुन्हेगारांस गोरेगाव पोलिसांनी केली अटक

### मुस्तफा जाफरीकडून हस्तगत केले लाखोचे दागिने

**दै.रायगड नगरी । अरविंद पोतदार**

**पनवेल** : नविमुंबई आयुक्तालय क्षेत्रात चोरींचा सफाटा लावुन अनेक आबालवृद्धांना फसवुन त्यांच्याकडुन दागिने लंपास करणारा रेकॉर्डवरचा गुन्हेगार मुस्तफा जाफरी याने चक्क रायगडात आ–पले चोरीचे जाळे पसरविल्याने रायगडात भितीयुक्त वातावरण पसरले होते.

कल्याण आंबिवली येथील आरोपी मुस्तफा जाफरी याची चोरी करण्याची पध्दत वेगळी होती. रस्त्यावर उभे राहुन हा प्रथम आपले सावज हेरत असे प्रामुख्याने अबाल वृद्ध, महीला यांना रस्त्यात गाठुन मुस्तफा सांगत असे पुढे खुन झाला आहे मी पोलीस आहे, अथवा लग्न समारंभात साड्या वाटत आहेत मोठी गर्दी आहे. तरी आपण आपले दागीने पीशवीत सुरक्षीत ठेवा असे विश्वासात घेऊन व बोलण्याच्या नादात गुंतवून हातचलाखीने त्या संबधीत व्यक्तीचे दागिने स्वतः जवळील पिशवीत घेऊन दुसरी छोट्या दगडाने भरलेली पिशवी संबधीतांच्या हातात देऊन तो पसार होण्यात या आरोपीचा हातखंडा



आहे. असाच एक प्रकार रायगड जिल्ह्या–तील गोरेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडला. सुनंदा विकास दोषी वय वर्षे ५६ रा.ब्राह्मण आळी मु.पो.गोरेगाव यांना आपण पोलीस असल्याची बतावणी करून त्यांना विश्वासात घेऊन त्यांच्या हातातील बांगड्या काढण्यास सांगुन हातचलाखीने स्वताकडे ठेवुन सुमारे तीन बांगड्या त्याची किंमत १ लाख ७८ हजार कीमतीच्या सोन्याच्या बांगड्या आरोपी मुस्तफा जाफरी याने घेऊन पोबारा केला. तेव्हा पासुन सदर आरोपीचा गोरेगाव पोलीस त्यांच्या मागावर होते. गोरेगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक एस.एस.नावले, एस.एस.सानप, वाय आर चव्हाण, जी.एन.समेळ, एस. यु.मुंडे यांनी वरीष्ठ यांच्या मार्गदर्शनाखाली शिताफीने या अट्टल गुन्हेगारास ताब्यात घेऊन बोलते करताच त्यांनी वरील गुन्हयाची कबुली दिली.

त्याच्याकडुन ३ सोन्याच्या बांगड्या हस्तगत करून गोरेगाव येथील फीर्यादी सुनंदा विकास दोषी यांना गोरेगाव पोलीसांनी सदर ऐवज सुपूर्द केल्याने गोरे–गाव पोलीसांच्या या उल्लेखनीय कामगीरीचे गोरेगावकर वासीय कौतुक करीत आहेत.

# ट्युशनमध्ये तीन वर्षीय मुलीला क्रूरपणे वागणूक, गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर येथील ट्युशन मध्ये तीन वर्षे मुलीला क्रूरपणे वागणूक करून दुखापत गेल्याप्रकरणी साधना गायकवाड यांच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात पुन्हा दाखल करण्यात आला आहे.

व्यवसायाने शिक्षक असलेले अजिनाथ वावरे यांची तीन वर्ष तीन महिन्यांची मुलगी अवनी हिला ऑगस्ट पासून साधना गायकवाड यांच्याकडे ट्युशन साठी पाठवत होते. अजिनाथ हे अवनीला घेऊन ट्युशनला गेले. त्यानंतर सायंकाळी तिला घेण्यासाठी आले असता तिच्या डाव्या गालावरती व उजव्या हाताच्या बाहूवरती गोलाकार लाल रंगाचे डाग दिसले. त्यावेळी साधना यांना विचारले असता त्यांनी काहीही माहिती नसल्याचे सांगितले. अजिनाथ हे अवनीला घेऊन घरी आले. यावेळी अवनीच्या उजव्या हाताच्या अंगठ्याजवळ तसेच डाव्या पायाच्या गुडघ्याजवळ छोटे लाल डाग दिसत होते. म्हणून त्यांनी अवनीला शुश्रूषा हॉस्पिटल, घरकुल सोसायटी, खारघर येथे नेले. डॉक्टरांनी हे डाग भाजल्यामुळे झाले असावेत असे सांगितले. व अंगावर लाल रंगाच्या डागाचे ठिकाणी त्वचा काळसर पडल्याचे दिसून आले.

यावेळी साधना गायकवाड यांनी त्यांच्या मुलीला क्रूरपणे वागणूक देऊन दुखापत केली असल्याची खात्री झाली. मात्र साधना गायकवाड यांनी हे कृत्य केले नसल्याचे सांगितले. त्यामुळे ट्युशनच्या शिक्षिका साधना गायकवाड यांच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.


# जिल्ह्यातील अधिकाधिक महिलांनी न घाबरता आपल्या तक्रारी मांडाव्यात : रुपाली चाकणकर

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडून महिला आयोग आपल्या दारी या उपक्रमांतर्गत रायगड जिल्हयात दि.१६ सप्टेंबर २०२२ रोजी सकाळी ११ वाजता, जिल्हा नियोजन भवन येथे जनसुनावणी आयोजित करण्यात आली असून आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती रुपाली चाकणकर आणि सदस्या या स्वतः तक्रारीची सुनावणी घेणार आहेत.

आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती रुपाली चाकणकर या दि.१६ सप्टेंबर २०२२ रोजी रायगड जिल्हयाचा दौरा करणार आहेत. केंद्र शासनाकडून सप्टेंबर महिना पोषण महा म्हणून साजरा करण्यात येतो. याचे औचित्य साधत आयोगाकडून पोषण पंचायत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दु.१२ वाजता होणाऱ्या या कार्यक्रमात आहारतज्ज्ञ, स्त्री रोग तज्ञ, अंगणवाडी सेविका, महिला, शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी सहभागी होणार आहेत. पारंपारिक खाद्यातून पोषक आहार यावर यावेळी मार्गदर्शन करण्यात येईल. त्यानंतर दु. ३ वाजता महिला आयोग अध्यक्षा रायगड जिल्हयाची आढावा बैठक घेणार असून यावेळी जिल्हाधिकारी, कामगार आयुक्त, पोलीस अधीक्षक तसेच आरोग्य, परिवहन, शिक्षण विभागाचे अधिकारी उपस्थित असतील. हे सर्व कार्यक्रम जिल्हा नियोजन भवन, रायगड येथे होणार आहेत.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग महिलांच्या सक्षमीकरणासाठी अविरत कार्यरत आहे. महिलांना त्यांच्या जिल्हयाच्या ठिकाणी न्याय मिळावा यासाठी महिला आयोग आपल्या दारी



उपक्रम राबविण्यात येत आहे. यामध्ये विभाग स्तरावर महिलांच्या तक्रारीचे निवारण करण्याचा प्रयत्न आहे. या जनसुनावणीवेळी पोलीस, प्रशासन, विधी सल्लागार समुपदेशक, जिल्हा समन्वयक उपस्थित राहणार आहेत.

ग्रामीण भागातील महिलांना मुंबई कार्यालयात येऊन तक्रार करणे, सुनावणीसाठी प्रत्यक्ष उपस्थित राहणे आर्थिकदृष्ट्या तसेच इतर कारणामुळे शक्य होत नाही. त्यांना या उपक्रमाचा फायदा होणार आहे. महिला आयोग आपल्या दारी अंतर्गत सुनावणी दरम्यान नव्या तक्रारीवर त्याच ठिकाणी कार्यवाही करण्यात येते आहे. त्यामुळे आपली कैफियत मांडणाऱ्या महिलांना त्वरित दिलासा देण्याचे काम आयोग याद्वारे करीत आहे.

अधिक माहितीसाठी श्रीमती सुनिता गणगे – ९७०२५४२०७१, शरद कोळेकर ७०३८६३००५८ यांच्याशी संपर्क साधावा. तसेच रायगड जिल्ह्यात होणाऱ्या जनसुनावणी अधिकाधिक महिलांना पुढे येऊन, न घाबरता आपल्या तक्रारी यावेळी मांडाव्या, असे आवाहन आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती रुपाली चाकणकर यांनी केले आहे.

# वाहन चालकास चाकूचा धाक दाखवून चोरी करणाऱ्या गुन्हेगारास अटक



**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीमुंबई व रायगड जिह्यात ऑगस्ट महिन्याच्या सुरवातीस प्रवासी म्हणून वहानात बसून प्रवास करीत असताना अचानक काही बहाणा करून वाहन थांबवून वाहन चालकाला चाकूचा धाक दाखवून त्याची कार, रक्कम जबरीने लुटण्याप्रकरणी गुन्हे शाखा कक्ष २ पनवेल ने आरोपीस जेरबंद केले आहे.

पनवेल जवळील मॅक्डोनाल्ड, कलंबोली समोर पुणे येथे जायचे असे सांगून ०४ इसम खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या आर्टिका कार क्र. MH 08-AN 9576 मध्ये बसले. सदर कार मुंबई–पुणे एक्सप्रेस वे वरून पुण्याच्या दिशेने जात असताना भातण बोगद्याच्या जवळ आले. त्या ४ इसमापैकी एकाने बाथरूम ला जाण्याचा बहाणा करून कार बाजूला घेण्यास सांगितले. त्याचवेळी त्याच्या सोबतच्या ३ जणांनी ड्रायव्हरला चाकूचा धाक दाखवून त्याच्याकडून रोख रक्कम व कार जबरीने घेऊन गेले.याबाबत कळंबोली पोलीस …/२

# सिडको प्रदर्शनी केंद्रातील बॉयलर इंडिया 2022 चे उद्घाटन

**दै.रायगड नगरी । ठाणे**

महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागाअंतर्गत असलेल्या बाष्पके संचालनालयाच्या वतीने आयोजित जागतिकस्तरावरील बॉयरल इंडिया २०२२ प्रदर्शन, चर्चासत्र व कार्यशाळेचे उद्घाटन आज उद्योग मंत्री उदय सामंत आणि कामगार मंत्री तथा परिषदेचे स्वागताध्यक्ष सुरेश खाडे यांच्या हस्ते झाले. राज्यात उद्योगासाठी पूरक वातावरण असून उद्योगांना लागणाऱ्या सर्व सुविधा व प्रोत्साहनपर पॅकेज राज्य शासन देईल, असे प्रतिपादन उद्योगमंत्री श्री. सामंत यांनी यावेळी केले.

वाशीतील सिडको प्रदर्शन केंद्राच्या ठिकाणी तीन दिवस बॉयलर इंडिया २०२२ प्रदर्शन, चर्चासत्र भरविण्यात आले आहे. यावेळी आमदार निरंजन डावखरे, आमदार महेश बालदी, आमदार रमेश पाटील, कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता सिंघल, विभागीय आयुक्त तथा रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, कामगार आयुक्त सुरेश जाधव, बाष्पके



संचालनालयाचे संचालक धवल अंतापूरकर, अदानी पॉवरचे थर्मल हेड चैतन्य प्रसाद साहू, थायसन ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक विवेक भाटिया आदी यावेळी उपस्थित होते.

या प्रदर्शनात जर्मनी, स्विझरलँड, इंग्लंड या देशासह दहा देशातील सुमारे २८० उद्योजकांनी या प्रदर्शनात सहभाग नोंदविला आहे. बाष्पके (बॉयलर) संबंधीत विविध यंत्रे, साहित्य यांची मांडणी येथे आहे. याशिवाय बाष्पके उद्योगातील नवन-वीन तंत्रज्ञान, घडामोडी यांची माहिती होण्यासाठी चर्चासत्र व परिसंवादाचे आयोजन तीन दिवस चालणार आहे. या क्षेत्रातील तज्ज्ञ यामध्ये मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी बॉयलर क्षेत्राशी संबंधित तीन पुस्तकांचे प्रकाशन मंत्री महोदयांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी श्री. सामंत म्हणाले की, बाष्पके (बॉयलर) क्षेत्रात होणारे बदल, या क्षेत्रासंबंधीची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोचविण्यासाठी हे प्रदर्शन उपयुक्त आहे. कामगार व उद्योग विभाग एकत्र येऊन उद्योगांना चांगल्या सुविधा देऊ. सध्या असलेल्या व नवीन उद्योगांनाही इतर राज्यांपेक्षा विज, जमीन व इतर प्रोत्साहनपर सुविधा महाराष्ट्र शासन देईल. राज्यात नवनवीन उद्योग येण्यासंदर्भात प्रधानमंत्री महोदयांशी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चर्चा केली असून वेदांतापेक्षाही मोठा उद्योग राज्यात आणण्यात येईल, असे प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांनी सांगितले आहे. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील उद्योग क्षेत्र वाढविण्यासाठी प्रयत्न करत आहे.

राज्यातील सर्व प्रकल्पांना इतर राज्यांपेक्षाही चांगल्या सुविधा देण्याचा राज्य शासन प्रयत्न करत आहे. बॉयलर उद्योग वाढीसाठीही राज्य शासन सर्वतोपरी मदत करेल. राज्यात बॉयलर पार्क उभारण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून पूर्ण मदत देण्यात येईल. तसेच या क्षेत्रासाठीही प्रोत्साहनपर पॅकेज देण्यासाठीही प्रयत्न करू, असेही श्री. सामंत यांनी यावेळी सांगितले.

## रोहा मेमुच्या फेऱ्या आणि थांबे रद्द केलेल्या एक्सप्रेस पुन्हा रोह्यामध्ये थांबणार

**दै.रायगड नगरी । रोहा**

मध्य रेल्वे च्या पनवेल ते रोहा विभागात प्रवशाना होत असलेल्या त्रासाबद्दल रोहा रेल्वे प्रवासी महासंघ समितीने मागील काही महिन्यांपासून मध्य रेल्वे कडे रोहा मेमु फेऱ्या वाढविण्यासाठी आणि जलद मेल एक्सप्रेस गाड्याना पुन्हा रोहा येथे थांबा देण्यासाठी पाठपुरावा केला होता त्या वेळी रेल्वे अधिकाऱ्यांनी या बाबत सकारत्मक उत्तर दिलं होते.

तसेच रोहा पासून पुढे विद्युतीकरण पूर्ण झाल्यावर जलद गाड्या रोहा मध्ये थांबतील अस आश्वासन दिलं होतं त्या अनुषंगाने दि.१५ सप्टेंबर २०२२ पासून कोकण रेल्वेच्या काही गाड्या विजेवर धावणार आहेत त्यामुळे या गाड्या लवकर रोहा मध्ये थांबतील अशी आशा समितीला आहे आणि



लवकरच रोहेकराना वाढीव नवीन रोहा -दिवा मेमु मिळेल अशी अपेक्षा आहे.

तसेच समितीने सर्व प्रवशाना आपले पास हे फक्त रोहा, नागोठणे आणि कासु स्टेशन येथूनच काढावे असे आव्हाहन केले आहे.

## कामगार नेते महेंद्र घरत यांच्या नेतृत्वाखाली एकाच दिवशी दोन कंपन्यात पगारवाढीचे करार

**दै.रायगड नगरी । उरण**

कामगारांच्या न्याय हक्कासाठी रात्रं दिवस लढणारे कामगार नेते तथा रायगड जिल्हा काँग्रेस अध्यक्ष महेंद्रजी घरत यांचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोनच वेगळा आहे. समाजात आपल्यासोबत असणाऱ्या सर्वांचा, मग ते सहकारी असो, मित्र असो, नातेवाईक असो किंवा सर्वसामान्य कामगार असो, सर्वांचा विकास झाला तर त्यांच्या आशीर्वादाने परमेश्वर आपल्यालाही भरभरून देतो असा त्यांचा विश्वास.

कामगार नेते महेंद्रजी घरत हे १६० कंपन्यातील १२००० कामगारांचे नेतृत्व करत आहेत. संघटनेमार्फत दरवर्षी १८ ते २० पगारवाढीचे करार केले जातात. वर्षभरात १० ते १५ नवीन कंपन्यांतील कामगार त्यांचे नेतृत्व स्वीकारत असतात. त्यांचे वैशिष्ठ म्हणजे जोपर्यंत शेवटचा कामगार समाधानी होत नाही तोपर्यंत करारावर सह्या करत नाहीत.



दिनांक १३ सप्टेंबर रोजी मे. लॅबगार्ड इंडस्ट्रिज पेण मधील कामगारांना तीन वर्षासाठी रुपये ९०००/-व मे. अष्टे लॉजिस्टिक पळस्पे पनवेल मधील कामगारांसाठी तीन वर्षासाठी रुपये ८०००/-पगारवाढ करण्यात आली. त्याच बरोबर बोनस, कामगारांच्या परिवारासाठी मेडिक्लेम पॉलिसी व इतर सोई सुविधा देण्याचे मान्य करण्यात आले.

या करारनाम्या प्रसंगी NMGKS संघटनेचे अध्यक्ष-कामगारनेते महेंद्र घरत, कार्याध्यक्ष -पि.के.रमण, सरचिटणीस -वैभव पाटील, तसेच लॅबगार्ड कंपनीचे ऑपरेशन डायरेक्टर अजय कणेकर, कामगार प्रतिनिधी सुभाष पाटील, प्रमोद पाटील, निलेश पाटील, दत्ता पाटील, निलेश टेमघरे, प्रदीप पाटील तर अष्टे लॉजिस्टिक कंपनीचे ऍडमिन मॅनेजर कांतीलाल पाटील, कामगार सुभाष पाटील, हेमंत पाटील, सुरेंद्र पाटील, विलास लबडे, रेवनाथ नाईक, गणेश घरत, गुरुनाथ मते, राम मते, पाडुरंग पैर, अरुण म्हसकर उपस्थित होते. दोन्ही कंपन्यांनातील कामगारांनी पगारवाढीबद्दल संघटनेचे आभार मानले.

## संकेत पाटील यांची नव भारतीय शिव वाहतूक संघटना भाजपा ट्रान्सपोर्ट सेलच्या जिल्हाध्यक्ष पदी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भाजप ट्रान्सपोर्ट सेलचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष हाजी अरफात शेख यांनी रायगड जिल्हा नव भारतीय शिव वाहतूक संघटना भाजपा ट्रान्सपोर्ट सेलच्या जिल्हाअध्यक्ष पदी संकेत पाटील यांची नियुक्ती केल्याने भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

याबाबत महाराष्ट्र राज्य अध्यक्ष हाजी अरफात शेख यांनी संकेत पाटील यांना नियुक्ती पत्र देऊन त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी निलेश निम्हण, मनोज रामराजे, देवेंद्र उपाध्यय, शेरू भाई, रेहमान भाई , सारंग पाटील , मयूर पाटील व सचिन पाटील आदी उपस्थित होते.



क्राईम रिपोर्टर आणि वरिष्ठ पत्रकार संजय कदम यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना मल्हार नेटवर्कचे मुख्य संपादक देवदास मटाले, मल्हार टीव्हीचे संपादक नितीन कोळी, पंकज डावलेकर, श्रीगणेश धुमाळ, अविनाश डोयरिया, विशाल पाटील, योगेश पाटील, चेतन पोपटा, अक्षय शार्दूल, संकेत भोईर, मनीषा हातमोडे. (छाया : योगेश पाटील).

## पनवेल-उरण महाविकास आघाडीला समाजवादी पार्टीची सोडचिठ्ठी

**दै.रायगड नगरी । उरण**

पनवेल-उरण विधानसभा क्षेत्रात महाविकास आघाडीत आपापसातील मतभेद वाढत चालले असून समाजवादी पार्टीने मात्र उघडपणे नाराजी व्यक्त केली आहे. समाजवादी पार्टीचे रायगड जिल्हाध्यक्ष अनिल नाईक यांनी पनवेल-उरण महाविकास आघाडीतुन जाहीरपणे बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत त्यांनी पनवेल-उरण महाविकास आघाडीचे अध्यक्ष बबन पाटील व सचिव सुदाम पाटील यांना तसे लेखी पत्रही दिले आहे. एकाएकी महाविकास आघाडीला समाजवादी पार्टीने सोडचिठ्ठी दिल्यान महाविकास आघाडीत धुसफूस असल्याचे स्पष्ट झाले आहे.



एकीकडे राज्यात शिंदे आणि ठाकरे या दोन गटांच्या मतभेदांवरून राजकारण चांगलेच ढवळून निघालेले असताना दुसरीकडे महाविकास आघाडीत देखील अनेक खलबत सुरू आहेत. राज्यात महाविकास आघाडी स्थापन झाल्यानंतर पनवेल-उरण विधानसभा क्षेत्रात महाविकास आघाडीने एकत्र येत आपली ताकद दाखवून दिली. शिवसेना, शेकाप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व समाजवादी पार्टीने पनवेल-उरण तालुक्यांत आपली मजबूत मोट बांधली होती. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आंदोलन असो किंवा अन्य कोणतेही आंदोलन असो, प्रत्येक आंदोलन, मोर्चात महाविकास आघाडीतील घटकपक्ष एकीचे दर्शन घडवीत होते. मात्र यापुढील निवडणुकांमध्ये समाजवादी पार्टी स्वतंत्रपणाने लढणार असल्याचे जिल्हाध्यक्ष अनिल नाईक यांनी सांगितले असून महाविकास आघाडीतील स्थानिक पक्षश्रेष्ठी नाईकांची समजूत काढून महाविकास आघाडीत घरवापसी करणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



गौरा गणेश उत्सवानिमित्त भाजपचे युवा नेते व पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी पनवेल शहर व परिसरातील श्री गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते. यावेळी आयोजकांच्यावतीने त्यांचे सहर्ष स्वागत करण्यात आले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## खोपटा-कळंबुसरे-चिरनेर बायपास रस्ता हरवला खड्ड्यात

आहे. त्यातच कळंबुसरे गावाजवळील बायपास रस्त्याची तर सध्या मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून सदर रस्त्याच खड्ड्यात हरवला असल्याचे भयानक चित्र पहावयास मिळत आहे.

उरण तालुक्यातील खोपटा पुल - कळंबुसरे - चिरनेर या बायपास रस्त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी मौजे कळंबुसरे हद्दीतील शेतकऱ्यांच्या जमिनी दहा वर्षापूर्वी ताब्यात घेतल्या आहेत.परंतु सदर जमिनीचा मोबदला आजतागायत कळंबुसरे गावातील शेतकऱ्यांना देऊ केलेला नाही.तरी सार्वजनिक बांधकाम विभाग उरण येथील उप अभियंता नरेश पवार यांनी कळंबुसरे गावातील शेतकऱ्यांना मोबदला मिळवून देण्यासाठी आणि खड्डे युक्त रस्ते खड्डे मुक्त करण्यासाठी पुढाकार घ्यावा न पेक्षा मनसेचे पदाधिकारी व कार्यकर्ते रस्त्यावर उतरून आंदोलन उभारतील असा इशारा शेवटी मनसेचे जिल्हाध्यक्ष संदेश भाई ठाकूर यांनी दिला आहे.

## वाहन चालकास चाकूचा धाक दाखवून चोरी करणाऱ्या गुन्हेगारास अटक

ठाण्यात गुन्हाची नोंद होताच सहाय्यक पोलीस आयुक्त सो (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली सदर गुन्ह्याचा समांतर तपास कक्ष २ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तपास करीत असताना सदर गुन्ह्यातील आरोपींच्या येण्या जाण्याच्या मार्गावरील सीसीटीव्ही फुटेज पाहून तांत्रिक तपास करीत असताना पोउपनि. मानसिंग पाटील यांना एक इसम चोरीची एर्तीगा कार विक्री करण्यासाठी टेम्बोडे ब्रीज जवळील परिसरात येणार असल्याची बातमी गोपनीय बातमीदारकरवी प्राप्त झाली होती. त्याप्रमाणे टेंबोडे ब्रिजच्या आसपास सापळा रचून आरोपी नामे महेंद्रप्रताप उर्फ अंकीत ग्यानेंद्र सिंग, वय ३० वर्षे, रा. कलंबोली मूळ गाव - प्रतापगड, राज्य उत्तर प्रदेश याला ताब्यात घेऊन त्याच्या अंगझडतीमध्ये नंबर प्लेट नसलेली एर्टिगा कार मिळून आल्याने सदर कारबाबत त्याच्याकडे चौकशी केली असता ती कलंबोली पोलीस ठाणे गुन्हा क्र.१७१/२०२२ भा द वि कलम ३९२,३४ प्रमाणे दाखल गुन्ह्यातील असल्याचे निष्पन्न झाले. त्याचप्रमाणे सदर आरोपीकडे आणखी तपास केला असता,त्यांनी देखील साथीदारांसह हिरानंदानी ब्रिज, खारघर येथून एका खाजगी प्रवासी घेऊन जाणाऱ्या एर्टिगा कारला थांबवून वाकडला जायचे आहे असे सांगून कार मध्ये बसून खालापूर टोल नाकाच्या अलीकडे त्यांच्यापैकी एकाने उलटी येत असल्याचा बहाणा करून कार थांबवून ड्रायव्हरला चाकूचा धाक दाखवून रोख रक्कम घेतले असल्याचे सांगितले. सदर बाबतीत खालापूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केला होता. सदरचे आरोपी हायवे रॉबरी सारख्या गुन्ह्यात सराईत असून त्यांच्यावर ठाणे शहर, एन आर आय पोलीस ठाणे येथे यापूर्वीही गुन्हे दाखल आहेत.अटक आरोपीकडून कलंबोली पोलीस ठाणेकडील गुन्ह्यातील एकुण १०,००,००० रुपये किंमतीची एर्तीगा कार जप्त करण्यात आली आहे.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते आम्ही मौजे : वेश्वी, ता.उरण, जि.रायगड येथील खाली नमूद केलेली मिळकत परेश सदाशिव पाटील व इतर यांजकडून प्रितम प्रभाकर मुंबईकर व चुलत काका रा.वेश्वी, पो.दिघोडे, ता.उरण, जि.रायगड यांनी विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| वेश्वी, ता.उरण, जि.रायगड | ८२/१/क | ०-२१-०० | ०.९८ |

तरी सदर मिळकतीचे बाबतीत अथवा तिच्या कोणत्याही हिश्श्याचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अॅटॅचमेंट, लीन, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा वगैरे कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी हरकती प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आम्ही सदर मिळकतीचे विक्री व हस्तांतरणाचे व्यवहार पूर्ण करू व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दि.१५/०९/२०२२

सही/-
**प्रितम प्रभाकर मुंबईकर**
**मु.वेश्वी, पो.दिघोडे, ता.उरण, जि.रायगड**
**मो.नं.८६५२२६४२७९**

मा.गोडसे सो
**अर्जदाराचे वकील : अॅड.संतोष एन. गायकवाड**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१२८६/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१५/१०/२०२२

१) श्रीमती.कानुबाई नारायण मुंगाजी
वय : ७७ वर्षे, व्यवसाय :
२) श्री.नंदराज नारायण मुंगाजी
वय : ५३ वर्षे, व्यवसाय :
रा. घर नं.४८६, ओवळे, उरण, पनवेल रोड,
राजिप शाळेजवळ, मु.ओवळे, पो.पारगाव,
ता.पनवेल, जि.रायगड, पिन नं.४१०२०६
३) श्री.शशिकांत नारायण मुंगाजी
वय : ४६ वर्षे, व्यवसाय :
रा.घर नं.४४१, ओवळे, उरण, पनवेल रोड,
राजिप शाळेजवळ, मु.ओवळे, पो.पारगाव,
ता.पनवेल, जि.रायगड, पिन नं.४१०२०६
४) श्री.गुरुदत्त नारायण मुंगाजी
वय : ३६ वर्षे, व्यवसाय :
रा.घर नं.३७९, ओवळे, उरण, पनवेल रोड,
राजिप शाळेजवळ, मु.ओवळे, पो.पारगाव,
ता.पनवेल, जि.रायगड, पिन नं.४१०२०६ अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, वरील अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील कै.नारायण नामदेव मुंगाजी हे दि.१९/०९/२०२० रोजी राहत्या घरी मु.ओवळे, पो.पारगांव, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. कै.नारायण नामदेव मुंगाजी हे हयात असताना त्यांच्या मृत्यूसमयी त्यांच्या नावे असणाऱ्या खालील वर्णनाच्या जमीन मिळकती ह्या सरकारतर्फे सिडकोने नवी मुंबई योजनेसाठी भूसंपादीत केल्या आहेत त्या जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**भूसंपादीत जमीन मिळकतीचे वर्णन**
**सिडको फाईल नं.उलवे १७०६**
**मौजे : ओवळे / पाडेघर, ता.पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| ३१ | ४+५+६ | ३.५७.०० पो.ख. ०.८६.०२ | ९.४५ |
| १३ | २ | ०.१८.०९ पो.ख. ०.०१.०८ | ३.८१ |
| ५९ | १० | ०.०२.०३ | ०.६० |
| ५९ | ५ अ | ०.१६.०८ पो.ख. ०.४४.०३ | १३.२६ |
| ३ | ७ ब | ०.२४.०० पो.ख. ०.०२.०३ | ३.७६ |
| ७ | ६ | ०.०६.०६ | १.३७ |
| ३ | ३९ | ०.१३.०० पो.ख. ०.०१.०० | २.०९ |
| १३ | ७ ब | ०.०८.०८ पो.ख. ०.०१.०८ | २.१२ |

येणेप्रमाणे जमीन मिळकतीचे वर्णन असून सदरहू जमीन मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार हे कै.नारायण नामदेव मुंगाजी यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह ना.कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन ना.कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१३ माहे ०९ सन २०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

| सही/- | | सही/- |
|---|---|---|
| क.लिपीक | कोर्टाचा शिक्का | सहा.अधिक्षक |
| दि.न्या.व.स्तर, पनवेल | | दि.न्या.व.स्तर, पनवेल |

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## नोकरीचे अमिष दाखवून ७ लाख 30 हजार रुपयांची केली फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठेमधील तरुणाला इंडियन नेव्हीमध्ये नोकरी लावण्याचे अमिष दाखवून ७ लाख ३० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे. याप्रकरणी संदीप भांगरे याच्याविरोधात कामोठे पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला आहे.

कामोठेमध्ये राहणारे विशाल पवार यांनी तक्रार दिली आहे. विशालची डिसेंबर २०२० मध्ये संदीप भांगरे याच्यासोबत ओळख झाली. तुमच्या भावाला नेव्हीमध्ये नोकरी मिळवून देतो असे आमिष दाखविले. त्याच्यावर भरवसा ठेवून डिसेंबर २०२० ते मार्च २०२१ दरम्यान ७ लाख ३० हजार रुपये त्याला दिले. दरम्यान, उ लॉकडाऊननंतर फोन बंद केला. विशाल यांनी भांगरे याच्या मावळ तालुक्यातील गावी जाऊन चौकशी केली असता त्याने यापूर्वी नोकरीचे आमिष दाखवून अनेकांची फसवणूक केली असल्याचे समजले. फसवणूक झाली असल्याचे लक्षात येताच विशाल याने तक्रार दिली आहे.

## आ.आदिती तटकरे यांची साखरचौथ गणेशोत्सव प्रसंगी सदिच्छा भेटी

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रायगड जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा राज्यमंत्री आदिती तटकरे यांनी रोहे तालुक्यातील विविध ठिकाणी संपन्न होत असलेल्या साखरचौथ गणेशोत्सव प्रसंगी सदिच्छा भेट देण्याचा कार्यक्रम नियोजनबद्ध पद्धतीने संपन्न करण्यात आला.

तालुक्यातील कोलाड, धाटाव, चणेरा, सुतारवाडी, नागोठणे, भातसई, खांब, धामणसई आदी विभागातील गा-वागावात संपन्न होत असलेल्या साखरचौथ गणेशोत्सव प्रसंगी रायगड जिल्हा माजी पालकमंत्री तथा राज्यमंत्री आदिती तटकरे यांनी तालुक्यातील विविध ठिकाणी गणेशोत्सव मंडळे तसेच घरगुती गणेशोत्सव कार्यक्रमात सदिच्छा भेटी देऊन गणरायांचे यथोचित पूजन करून मनोभावे ्दर्शन घेतले.तर या सदिच्छा भेट कार्यक्रमात त्यांनी धामणसई विभागातील विविध गावांमध्ये गणेशोत्सव कार्यक्रमात भेटी देऊन मंडळाचे वतीने राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमांचे जाहिररित्या कौतूक केले.यावेळी त्यांच्या समवेत तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक अध्यक्ष जयवंत मुंडे,पिंगळसई माजी सरपंच अनंत देशमुख,युवा कार्यकर्ते मारूती तुपकर, महेश तुपकर आदी उपस्थित होते.

# एमएमआरडीए आयुक्तांना रस्त्यांच्या बाबत काँग्रेस पक्षाचे निवेदन

**दै.रायड नगरी । माथेरान**

एमएमआरडीए ही देशातील अग्रगण्य नाव-ाजलेली संस्था असून याच एमएमआरडीए च्या माध्यमातून माथेरान या पर्यटनस्थळावर होत असलेली कामे ठेकेदारांच्या चालढकल, अयोग्य नियोजन आणि एमएमआरडीए च्या अधिकारी वर्गाच्या दुर्लक्षित पणामुळे क्ले पेव्हर ब्लॉकच्या रस्त्याची कामे तकलादू झाल्याने पहिल्याच पावसात याचा अनुभव सर्वांनाच आला आहे. याकामी ही होणारी कामे सुयोग्य पद्धतीने टिकाऊ आणि नियोजन बद्ध व्हायला हवीत यासाठी माथेरान करांच्या वतीने काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष मनोज खेडकर यांनी एमएमआरडीएचे अतिरिक्त महानगर आयुक्त गोविंदराज व मुख्य अभियंता भांगरे यांची दि.१३ रोजी मुंबई येथील कार्यालयात भेट घेऊन क्ले पेव्हर रस्त्यांची झालेली एकूणच दुर्दशा निदर्शनास आणुन दिली आणि सविस्तरपणे चर्चेनंतर निवेदन सादर केले.यावेळी काँग्रेसचे माजी विरोधी पक्षनेते शिवाजी शिंदे उपस्थित होते.



सर्व उतारांवर पावसाच्या पाण्याचा निचरा योग्य प्रकारे व्हावा याकरीता स्टॉर्म वॉटर ड्रेन करण्याची मागणी मनोज खेडकर यांनी निवेदनात केली. त्यादृष्टीने काम करण्याचे निर्देश अतिरिक्त आयुक्त गोविंदराज व मुख्य अभियंता भांगरे यांनी कार्यकारी अभियंता अरविंद धाबे यांना दिले आहेत.

त्याकरिता रस्त्याच्या लेवलच्यावर आलेल्या भिंती अनावश्यक असुन त्या पेव्हर ब्लॉकच्या लेवललाच थांबल्या तरच पाणी बाजुच्या गटारात अथवा जंगलात वाहुन जाईल व रस्ते चिरकाळ टीकतील. अन्यथा पेव्हर ब्लॉक अतिवृष्टीमुळे उखडले जातील व रस्त्याचा नाला होईल ही बाब मुख्य अभियंता यांनी देखील मान्य केली. आणि यापुढे साईड वॉल रस्त्याच्या लेवललाच ठेवणेचे निर्देश गोविंदराज यांनी दिले आहेत. त्यामुळे लवकरच एम.एम.आर.डि.ए. त्यांचे अभियांत्रीकी कौशल्य वापरुन झालेल्या चुका दुरुस्त करेल व टीकाऊ रस्ते बनवेल असा विश्वास खेडकर यांनी व्यक्त केला आहे.

यावेळी बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्ष मनोज खेडकर म्हणाले की, माथेरानची भौगोलिक परिस्थिती पाहून ब्रिटिशांनी त्यावेळेस माथेरान मधील रस्ते तयार केले पण ते करण्याअगोदर त्यांनी गटाराला महत्व देत गटारे काढली. त्यामुळे इतकी वर्षे अजूनही रस्ते काही ठिकाणी सुस्थितीत आहेत.

एमएमआरडीए चे अधिकारी त्यांचे कौशल्य वापरून रस्ते करत आहेत. इतर ठिकाणांपेक्षा येथील परिस्थिती वेगळी आहे. त्यामुळे एमएमआरडीए ने या ठिकाणी रस्ते बनविण्याअगोदर गटाराचे नियोजन करावे त्यामुळे जोरदार पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचा निचरा योग्य प्रकारे होऊन रस्ते टिकून राहतील. सध्या गटारे नसल्यामुळे आणि रस्त्याच्या दुतर्फातील गॅबियनना उगाचच जास्त उंची दिल्याने पावसाचे पाणी रस्त्यावरूनच वाहत आहे. हे सर्व आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिले आहे.

## सागरी सुरक्षिततेच्या दृष्टीने मासेमारी नौकेवरील कार्यरत नौकामालक, तांडेल व खलाशांना मिळणार क्यू आर कोड आधारकार्ड

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

केंद्र शासनाकडून मासेमारी नौकेवरील कार्यरत नौकामालक, तांडेल व खलाशी यांना सागरी सुरक्षिततेच्या दृष्टीने क्यू आर कोड असलेले आधार कार्ड देण्याबाबत कळविण्यात आले आहे. संस्थेमार्फत प्राप्त अर्ज व त्याचा गोषवारा नोडल अधिकाऱ्यांमार्फत प्रादेशिक आधार ओळखपत्रे कार्यालय यांच्या सॉफ्टवेअर द्वारे अपलोड करण्यात येतो.

उर्वरित स्थानिक व परप्रांतीय खलाशी वर्ग तसेच क्रियाशील मासेमाऱ्यांना क्यू आर कोड असलेले ओळखपत्र देण्याच्या दृष्टीने दि.१२ सप्टेंबर ते दि.१२ ऑक्टोबर २०२२ या कालावधीपर्यंत अर्ज घेवून कार्ड वितरीत करण्याची कार्यवाही करण्याबाबत मुख्य कार्यालयाने कळविले आहे. सागरी सुरक्षेच्या दृष्टीने वातावरण अत्यंत संवेदनशील असल्यामुळे समुद्रात मासेमारी करणाऱ्या सर्व नौकांची काटेकोर तपासणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यादृष्टीने आपल्या कार्यक्षेत्रातील सागरी मासेमारी करणाऱ्या उर्वरित नौका मालक/ तांडेल/ खलाशी तसेच नव्याने आलेले तांडेल व खलाशी यांना नवीन आधार ओळखपत्र उपलब्ध करून देण्याबाबत त्वरित कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

उर्वरित नौका मालक / तांडेल / स्थानिक व परप्रांतीय खलाशी तसेच नव्याने आलेले तांडेल व खलाशी यांचे अर्ज सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय, रायगड-अलिबाग या कार्यालयास सादर करावे जेणेकरून प्रादेशिक आधार ओळ-खपत्रे कार्यालय यांच्या सॉफ्टवेअर द्वारे अपलोड करून देणे सोयीचे होईल. ज्या नौका मालक / तांडेल / स्थानिक व परप्रांतीय खलाशी यांचे अर्ज या कालावधीत अपलोड होणार नाहीत त्यांना दि.१९ ऑक्टोबर २०२२ पासून समुद्रामध्ये मासेमारीकरिता सागरी सुरक्षेच्या दृष्टिकोनातून जाता येणार नाही याची गांभीर्याने नोंद घ्यावी व तात्काळ कार्यवाही करावी, असे मत्स्यव्यवसाय सहाय्यक आयुक्त एस.आर.भारती यांनी कळविले आहे.

## महेंद्र घरत यांच्या कडून मदतीचा हात



**दै.रायगड नगरी । उरण**

रायगड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष, रायगडचे दानशुर नेते महेंद्रशेठ घरत यांच्या कडून आळंदी येथील वारकरी सांप्रदायिक पनवेल-खालापूर पायी कोंकण दिंडी धर्मशाळा च्या डागडुजी साठी व रसायनी येथील रीस गावातील हनुमान मंदिराच्या जिर्णोद्धरासाठी प्रत्येकी रूपये १,००,०००/- ( एक लाख रुपये ) ची देणगी स्वरूपात अशी २ लाखाची मदत देण्यात आली आहे. यावेळी खालापूर तालुका काँग्रेस अध्यक्ष कृष्णाशेठ पारंगे व धर्मशाळा ट्रस्ट कमिटी चे सदस्य, कार्यकर्ते उपस्थित होते.

## शिवशाही प्रतिष्ठानचा साखरचौथ गणपती : हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक मानले जाणा-या ,भक्तांच्या हाकेला धावणाऱ्या भाविकांचे श्रद्धास्थान मानल्या जाणाऱ्या मुरुड तालुक्यातील नांदगावच्या शिवशाही प्रतिष्ठान आयोजित साखरचौथ गणेश उत्सव मित्र मंडळातर्फे बाजारपेठेतील साखरचौथ गणपतीची स्थापना मोठ्या उत्साहात करण्यात आली. यंदाच्या पुजेचा मान सौ.नेहा नरेश कुबल कुटुंबियांना मिळाला.

नांदगाव मधील शिवशाही प्रतिष्ठान साखरचौथ गणेश उत्सव मित्र मंडळाच्या वतीने सन.२०१३ पासून साखर चौथ गणपती बसविला जात असून यंदाचे दहावे वर्ष आहे. या आयोजित सोहळ्यामध्ये प्रतिष्ठानच्या स्थापनेपासून महेश मापगांवकर,सुदेश घुमकर, शैलेंद्र दिवेकर, विलास सुर्वे, उदय थळे, सुयोग इंदुलकर, सुमित कांबळे, दिनेश शाहपूरकर, यांना साखरचौथ गणपती पुजेचा मान मिळाला असून यंदाच्या पुजेचा मान नरेश कुबल यांना मिळाला आहे. मंगळवार दि.१३सप्टेंबर २०२२ रोजी सकाळी ८.०० वा.श्री मुर्तीची विधिवत प्राणप्रतिष्ठापना, आरती करण्यात आली. यानिमित्ताने सायंकाळी ७.०० वा.संगीत भजनाचा सुश्राव्य बहारदार कार्यक्रम, रात्री९.०० वा.महिलांचे हळदी कुंकू कार्यक्रम व रात्रौ १२.०० वा.महाआरती घेण्यात आली. यावेळी भक्त गण मोठ्या संख्येने उपस्थित होते. बुधवार दि.१४ सप्टेंबर २०२२ रोजी सकाळी विधिवत पूजा अर्चा आरती व सायंकाळी ५.०० वा.श्री मुर्ती ची गावातून भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून विसर्जन सोहळा संपन्न झाला.

शिवशाही प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुदेश घुमकर, उपाध्यक्ष दिनेश रावजी, साखरचौथ गणेश उत्सव मित्र मंडळाचे कार्याध्यक्ष यो-गेश जायसवाल, उपाध्यक्ष सुदेश भणगे , राजू पोतदार, उत्तम शेळके, महेश कोतवाल, दिनेश शाहपूरकर, राजू देऊळकर, ओमकार साखरकर, सिद्धेश किर, जितेंद्र दिवेकर, उदय थळे, अनंता कुमरोटकर, विशाल पाटील, महेश मापगांवकर, मंगेश देऊळकर, मिलिंद माळी, चंद्रकांत देऊळकर, निखिल पुलेकर, संदीप थळे, प्रभाकर निरकर, राज पवार, मुर्तीकार सतिश जोशी, जयेश देऊळकर, दिपक पवार, जितेंद्र सुर्वे, अशोक पाटील, सुरेंद्र देऊळकर,तेजस रावजी, प्रभाकर गाणार, गजानन शाहपूरकर, कुणाल गाणार, कल्पेश मळेकर आदी. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेत आहेत.



## कळंबोली जंक्शन वरील बंद सी सी कॅमेरे सुरू करून त्यांची संख्या वाढविण्याची स्त्री शक्ती फाऊंडेशनची सिडकोकडे मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली जंक्शन वरील बंद सी सी कॅमेरे सुरू करून त्यांची संख्या वाढविण्याची मागणी स्त्री शक्ती फाऊंडेशनने सिडको कडे केली आहे .

स्त्री शक्ती फाऊंडेशनच्या संस्थापक, अध्यक्ष स. विजया कदम यांनी सिडको टेलिकॉम विभागाचे मुख्य अभियंता यांची भेट घेऊन कळंबोली येथून मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग सुरू होतो. याशिवाय पनवेल- सायन, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ आणि ४ ब सिडको कडे आहे. मुंबई-गोवा महामार्गाला जाण्यासाठी कळंबोली सर्कलवरूनच मार्ग आहे. विशेष करून जेएनपीटी कडे मोठ्या प्रमाणात वाहने एन एच४बीवरून जातात आणि येतात. कळंबोली स्टील मार्केट परिसरातही अवजड वाहने येतात. मुंबईकडे येथूनच सर्व लहान-मोठे वाहने जातात. एकंदरीतच २४ तास येथे वाहनांची वर्दळ असते. चारही बाजूने वाहने येत अस तरी जेएनपीटी कडे जाणाऱ्या येणाऱ्या कंटेनरची संख्या जास्त आहे. हे जंक्शन अतिशय महत्त्वाचे असून चारही बाजूला महामार्ग जातात. या ठिकाणी दररोज लहान-मोठे अपघात घडतात. त्याचबरोबर गुन्हेगारांचे वाहने परस्पर विरोधी दिशेने जातात. त्यांच्यावर वॉच ठेवण्याची अत्यंत आवश्यकता आहे. तसेच वाहतूक कोंडी फोडण्याच्या दृष्टिकोनातून येथे लक्ष असणे गरजेचे आहे.

वाहतुकीच्या नियम तोडणारे चालक त्वरित डिटेक्ट होणे क्रमप्राप्त आहे. या पार्श्वभूमीवर कळंबोली सर्कल ला सीसीटीव्ही कॅमेरा ची आवश्यकता आहे. सिडकोने काही पॉईंटवर हे कॅमेरे बसवले सुद्धा, मात्र ते बंद अवस्थेत असल्याचे समजते. त्यामुळे त्या कॅमेऱ्यांचा काहीच फायदा नसल्याचे दिसून येत आहे. बंद अवस्थेतील असलेले सीसीटीव्ही कॅमेरे त्वरित सुरू करण्यात याव्यात. त्याच बरोबर कळंबोली सर्कल वर कॅमेऱ्यांची संख्या वाढवण्यात यावी जेणेकरून या जंक्शन वर चारही बाजूने करडी नजर ठेवता येईल.


स्थानिक पोलिस तसेच वाहतूक पोलिसांचे काम सोपस्कर होईल. येथे वाहतुकीचे नियम जे मोडतात त्यांच्यावर वचक ठेवता येईल तसेच गुन्हेगारांना पकडणे सोपे होईल.

अपघात करून पळ काढणाऱ्या वाहन चालक कोणत्या दिशेला गेला आहे हेसुद्धा समजेल. तसेच वाहतूक कोंडी फोडण्यासाठी मदत होईल या सर्व पार्श्वभूमीवर कळंबोली सर्कल पूर्णपणे क्लोज सर्किट कॅमेऱ्यांच्या नजरेखाली आणण्यात यावे त् अशा प्रकारची मागणी नोडल एजन्सी म्हणून आपल्याकडे करीत असल्याचे स्त्री शक्ती फाऊंडेशनच्या संस्थापक, अध्यक्ष स. विजया कदम यांनी सांगितले .

## जंगल परिसरात फेरफटका मारताना परदेशी पाहुण्यास झाले भेकरीचे दुर्लभ दर्शन

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव तालुका परिसरातील जंगल वनसंपदा आणि सौंदर्य पावसाळ्यात नवनवी, झाड, वेली, पान, फूलांनी आणखी खुलते. याठिकाणी हौशी पर्यटन छायाचित्रणा साठी परदेशा-तुन आलेले डेव्हिड वकॉक हे वन्यजीव अभ्यासक शंतनु कुवेसकर सोबत जंगलात सकाळच्या समयी फेरफटका मारीत असताना त्यांना अगदी जवळुन नजरेस पडलेले हरिण प्रजातितील सुंदर शांत जीव, भेकर दिसली. त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता हा क्षण आपल्या कॅमेरॅत कैद केला आणि भेकर चपळाईने डोळ्याचे पाते लवते न लवते तोच जंगलात निघुन गेली. या सुंदर वन्य जीवाच्या दुर्लभ दर्शनाने परदेशी पाहुणा खुप आनंदी झाला.



हे सुंदर जीव एखाद्या प्राणी संग्रहालयात पिंजऱ्यात आपण पाहतो, पण अलिकडे तेही शक्य नाही. लागणारे वणवे, याआधी झालेली बेसुमार वृक्षतोड, मानवाचे अनधिकृतपणे अतिक्रमण व क्रुर शिकारीप्रवृत्तींनी जंगल वनसंपदा नष्ट होत, ओस पडत चालली आहे. अशा विपरित स्थितीत असे वन्य जीवाचे दुर्लभ प्रत्यक्ष साक्षात दर्शन अवर्णनिय आहे. समाधानाची बाब हिच कि तालुक्यात वन विभागाची करडीनजर व कडक कायदे यामुळे आता पुन्हा एकदा ही जंगलं जीवंत झाली असल्याचे हे शुभसंकेत असुन पर्यटनाचे दृष्टीकोनातुन त्यांचे संरक्षण आणि संवर्धन केल्यास जगाच्या काना कोपऱ्यातुन पर्यटक येथे येतिल आणि नवनविन रोजगाराच्या संधी देखिल उपलब्ध होतील.

## नांदगावच्या प्राथमिक आरोग्य पथकाला आरोग्य केंद्राचा दर्जा मिळावा : भाजपचे गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील आरोग्य सेवेत असलेल्या प्राथमिक आरोग्य पथकाला प्राथमिक आरोग्य केंद्राचा दर्जा मिळावा. यासाठी भारतीय जनता पार्टीतर्फे तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर व उपाध्यक्ष स्वप्नील चव्हाण यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत तालुका पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुभाष वाणी यांना एक निवेदन सादर करण्यात येऊन मागणी करण्यात आली आहे.



याबाबत तालुका उपाध्यक्ष स्वप्नील चव्हाण यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, प्राथमिक आरोग्य पथक नांदगांव हे पंचक्रोशीतील एकमेव आरोग्य पथक असून सध्या हे विविध समस्यांचे आजार बनले आहे. या पथकामध्ये आजूबाजूच्या गावातील रुग्ण आरोग्य सेवेचा लाभ घेण्यासाठी येत असून सध्या त्यांना विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. येथे निवासी वैद्यकीय अधिकारी यांची कमतरता असल्याने रात्री अपरात्री नांदगाव मजगांव पंचक्रोशीतील रुग्णांना मुरुड अलिबाग जावे लागत आहे. तसेच याठिकाणी वैद्यकीय अधिकारी डॉक्टर उपलब्ध नसल्याने रुग्ण सेवेमध्ये वारंवार अडचणी निर्माण होत आहेत, कोविड - १९ या महामारीतून ही आपण घडा घेतला नसल्याचे या समस्यामुळे पुन्हा अधोरेखित होत आहे. गर्भवती स्त्रियांना देखील वेळेवर उपचार उपलब्ध होत नसल्याने त्यांना पुढील उपचारास अलिबाग- मुंबई येथे जावे लागत आहे.

नांदगाव येथील प्राथमिक आरोग्य पथकाचे रूपांतर प्राथमिक आरोग्य केंद्रात करून वैद्यकिय सेवांची उपलब्धता करून द्यावी.

जेणेकरून येथील गोरगरीब जनतेस प्राथमिक आरोग्य केंद्राची सुविधा उपलब्ध होईल. असे भारतीय जनता पार्टीतर्फे गटविकास अधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे.यावेळी भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर, उपाध्यक्ष स्वप्नील चव्हाण, तालुका संघटन सरचिटणीस प्रवीण बैकर, संदीप पानवलकर,सुधीर पाटील,सुदाम वाघीलकर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## दिड फूटाच्या नागिणीला जिवदान

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरूड तालुक्यातील मजगाव येथे अभिजीत तांबडकर यांच्या घराच्या अंगणात रात्रीच्या वेळी उंदीर खाण्यासाठी आलेल्या फक्त दिडफुटाच्या नागिणीला न मारता सर्प मित्र संदीप घरत यांच्या सहाय्याने जिवदान दिल्याने समाधान व्यक्त होत आहे. मजगाव येथिल अभिजीत तांबडकर यांच्या घराच्या अंगणात भक्ष्याच्या मागे आलेल्या विषारी जातीचा नागिण सर्प उंदीर खाऊन आलेला पाहीला. त्यावेळी आजुबाजुच्या ग्रामस्थांनी मारुनये याकरिता अभिजीत तांबडकरने, प्रयत्न केले. त्याने सर्पमित्र संदीप घरत याला संपर्क करुन बोलावून घेतले. आणि नागिणीला जिवदान दिल्याने सर्वत्र समाधान व्यक्त होत आहे.